# वनस्थळी

जुलै २०११



## निर्मलाताई पुरंदरे

**भावपूर्ण श्रध्दांजली**

Scanned with CamScanner

# अंतरंग

✧ श्रद्धांजली


- संपादकीय.... : शलाका ठाकूर / ४
- छळणार नाही ग दिन सखये ! : माणिक कोतवाल / ५
- मला भावलेल्या ताई : निर्मल पेंढरकर / ६
- श्रद्धांजली : सुषमा साठ्ये / ७
- सेवाव्रती : भारती भिडे / ९
- श्रद्धांजली : भार्गवी कुलकर्णी / १०
- 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' : सुनंदा नवले / ११
- नातं वनस्थळीशी : विनया जोगळेकर / १२
- संपादकीय : शलाका ठाकूर / १३
- अभिप्राय / १५


✧ लेख विभाग


- नाटककार महिला आणि मराठी सामाजिक नाटक : डॉ. सुवर्णा दिवेकर / १८
- माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांचे देशवासीयांना पाठविलेले पत्र विलास : श्रीधर कुलकर्णी / २२
- डॉ. सरोजिनी बाबर जन्मशताब्दी वर्ष : सौ. अश्विनी जोशी / २४
- वनदेवता राहीबाई : पुष्पा निऱ्हाळी / २७
- 'सहयोगी अध्ययन' (Co-operative Learing) : श्री. सतीश पोर / २९
- आनंदे वाचूया : श्रीमती माधुरी ओक / ३३
- बनगरवाडी आणि तहान या कादंबऱ्यांमधून व्यक्त होणारा पर्यावरणाचा विचार (गोषवारा) / ३५
- पुस्तक परिचय जवान - चंदू चव्हाण : शलाका ठाकूर / ३९
- पुस्तकांचे संक्षिप्तीकरण - काळाची गरज : नंदिनी चांदवले / ४२
- भारतीय सणांचा पर्यावरणावर होणारा परिणाम (सर्वेक्षण) : डॉ. अंजली रामचंद्र कदम व विद्यार्थिनी / ४६
- कृष्णा नदी : सौ. कल्पना रायरीकर / ५०
- अन्न हे पूर्णब्रह्म : सुनंदा दळवी / ५२
- पाणी टंचाई : सौ. अश्विनी कांबळे / ५३
- समाजाकडून विशेष मुलांची स्वीकृती : सौ. छाया दिलीप पवार / ५५


✧ कथा विभाग


- ''मिनी बँक'' : प्रतिमा जोशी / ५७
- कोंदण : राधिका भांडारकर / ५९




Scanned with CamScanner

# भारतीय सणांचा पर्यावरणावर होणारा परिणाम

**(सर्वेक्षण)**

**प्रस्तावना**

आपण जाणतोच की, सध्याच्या काळात पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होताना दिसत आहे. हळूहळू सर्व पर्यावरणीय स्त्रोतांचा वापर जास्त प्रमाणात होत आहे. भारतामधील पूर्वापारपासूनच मानवी जीवनशैली ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे पर्यावरणाशी नाळ जोडली गेली आहे. म्हणजेच पूर्वापारपासून साजरे केले जाणारे सण हे पर्यावरणाचा विचार करतात व पर्यावरण संवर्धनाचा अप्रत्यक्षपणे उपदेशही देत असतात.

पर्यावरणवाद एक सामाजिक आणि पर्यावरणीय चळवळ आहे आणि ते पर्यावरणविषयक समस्यांवर कार्य करते. पर्यावरणविषयक समस्यांचे परिणाम कमी करण्यासाठी किंवा रोखण्यासाठी पर्यावरणीय स्थिरता आणणे महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय समस्यांना मानव हाच कारणीभूत असल्याचे दिसून येत आहे.

वेगवान आर्थिक विकासामुळे गेल्या दहा दशकात भारताला अनेक फायदे मिळाले असले तरीही पर्यावरणाची हानी झाली असल्याचे आढळून आले आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे तर गंभीर वायू आणि जल प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे. पृथ्वी ही मानवाला पूर्वजांपासून मिळालेली देणगी असून, ती आपण आपल्या भावी पिढीसाठी सुरक्षित ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

भारतातील सण व स्त्रिया यांचा जवळचा संबंध आहे. कारण पूर्वापार काळापासून वेगवेगळे सण हे स्त्रिया उत्साहाने साजरे करत असतात. त्यामुळे बदलत्या जीवनशैलीमुळे त्याच्या दैनंदिनीही व्यस्त होत आहेत. त्या घरातील कामासोबतच घराबाहेर पडून स्वत:च्या पायावर उभ्या राहात आहेत. अशामध्ये त्यांच्या संस्कृती व पर्यावरणाचा दृष्टिकोन कसा आहे? बदलत्या जीवनशैलीचा पर्यावरणावर होणारा परिणाम पाहाणे, पर्यावरणाबाबतीत महिलांची जागरूकता तपासणे, शिक्षणाचा प्रसार हा पर्यावरणाची जपणूक करण्यास समर्थ आहे का हे पहाणे, बदलत्या जीवनशैलीचा कल पर्यावरणाकडे की संस्कृतीकडे ही उद्दिष्टे शोधण्यासाठी महाराष्ट्रातील १०० महिलांकडून केल्या गेलेल्या प्राथमिक नमुना संकलन पद्धतीच्या सर्वेक्षणातून तपासण्याचा प्रयत्न केला आहे. वरील सर्वेक्षणातून पुढील गृहीतक तपासण्यात आले जसे विकास व संस्कृती यांचा मेळ घातला जात आहे. हे विधान सत्य झाल्याचे निदर्शनास आले, तसेच आधुनिक जीवनशैलीमध्ये पर्यावरणाला हानीही होत नसल्याचे विधान सत्य झाले आहे आणि गतिमान अर्थव्यवस्थेमुळे पर्यावरणाचा ऱ्हास व संस्कृतीचा लोप होत आहे हे विधान असत्य ठरल्याचे आढळून आले.

भारतीय संस्कृती आणि पर्यावरण यातील जपणूक साधता जरी आली असले, तरीही मानवाची जशी जशी प्रगती होऊ लागली, जसजसा तंत्रज्ञानाचा विकास होऊ लागला, पर्यावरणाची हानी होऊ लागली. आता काळाबरोबर ही गुंतागुंत वाढतच चालली आहे. पर्यावरणाच्या विकासासाठी आपण भारतीय संस्कृतीचा आधार घेऊन पर्यावरणाच्या संवर्धनासाठी काही ठोस पावले उचलणे ही काळाची गरज आहे.

सध्याच्या काळात पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होताना दिसत आहे. हळूहळू सर्व पर्यावरणीय स्त्रोतांचा वापर जास्त प्रमाणात होत आहे. आपण पाहातो की,



Scanned with CamScanner

भारतामध्ये जी जीवनशैली आहे ती नेहमीच पर्यावरणाच्या संवर्धनाचा विचार करते म्हणजेच साजरे केले जाणारे सण हे पर्यावरणाचा विचार करतात व पर्यावरण संवर्धनाचा अप्रत्यक्षपणे उपदेश देत असतात.

भारतातील सण व स्त्रिया यांचा जवळचा संबंध आहे. कारण पूर्वापार काळापासून वेगवेगळे सण हे स्त्रिया उत्साहाने साजरे करत असतात. त्यामुळे बदलत्या जीवनशैलीमुळे त्यांच्या दैनंदिनीही व्यस्त होत आहेत. त्या घरातील कामासोबत घराबाहेर पडून स्वत:च्या पायावर उभ्या राहात आहेत. अशामध्ये त्यांचा संस्कृती व पर्यावरणाचा दृष्टिकोन कसा असेल हे खालील सर्वेक्षणातून तपासण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश :**

भारतामध्ये महिलांची बदलती जीवनशैली पर्यावरणास कारक ठरते की मारक ठरते हे पाहाणे.

**उद्दिष्ट्ये :**

* बदलत्या जीवनशैलीचा पर्यावरणावर होणारा परिणाम पाहाणे.
* पर्यावरणाबाबतीत महिलांची जागरूकता तपासणे.
* शिक्षणाचा प्रसार हा पर्यावरणाची जपणूक करण्यास समर्थ आहे का हे पाहाणे.
* बदलत्या जीवनशैलीचा कल पर्यावरणाकडे की संस्कृतीकडे आहे हे शोधणे.

**गृहीतके :**

* आधुनिक जीवनशैलीमध्ये पर्यावरणाला हानी होत नाही.
* विकास व संस्कृती यांचा मेळ घातला जातो.
* गतिमान अर्थव्यवस्थेमुळे पर्यावरणाचा ऱ्हास व संस्कृतीचा लोप होतो / नाही?

**संशोधन पद्धती :**

या सर्वेक्षणासाठी प्राथमिक नमुना संकलन पद्धती वापरली आहे. यामध्ये काही प्रश्नांच्या आधारे एक प्रश्नावली तयार करून महाराष्ट्रातील १०० महिलांकडून भरून घेण्यात आली आहे. ही माहिती गोळा करण्यासाठी प्रत्यक्ष जाणे शक्य नव्हते म्हणून मोबाईलद्वारे संपर्क साधून ही माहिती गोळा केली गेली आणि सर्वेक्षण पूर्ण केले.


**सर्वेक्षणाचे विश्लेषण :**

यामध्ये संकलित केलेल्या माहितीचे दोन भागांत विभाजन करण्यात आले आहे. यावरून आपणास असे स्पष्ट होते की, शिक्षणाचा प्रसार कशाप्रकारे पर्यावरणाच्या जपणुकीचा दृष्टिकोन निर्माण करते ते खालील प्रकारे स्पष्ट करता येईल.

*** शिक्षणाचे प्रमाण व कामाच्या स्वरूपाचे प्रमाण :**

१०० नमुन्यांद्वारे संकलन केलेल्या माहितीच्याद्वारे आपल्याला समजून येते की, ९२% स्त्रिया शिक्षित आहेत, तर ९% स्त्रिया या अशिक्षित आहेत. तसेच अशिक्षित स्त्रियांमध्ये ११.११% स्त्रिया नोकरी करतात. ३३.३३% स्त्रिया व्यवसाय करतात. तर ५५.५५% स्त्रिया ह्या काहीच करत नाहीत. यावरून दिसून येते की, अशिक्षित स्त्रियांमध्ये जास्त प्रमाणात स्त्रिया काहीच करत नाहीत.

सुशिक्षित स्त्रियांमध्ये नोकरी प्रमाण हे २६.०८% आहे, तर व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ३८.०४% इतके आहे. तर काहीच न करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ३४.७८% इतके आहे.



वरील आलेखावरून असे समजून येते की, नोकरी व व्यवसाय यांची टक्केवारी शिक्षित स्त्रियांमध्ये जास्त आहे. तर काहीच करत नाही याचे प्रमाण अशिक्षित तुलनेने शिक्षितमध्ये जास्त आहे. यावरून असे दिसून येते की, शिक्षणाच्या प्रसारामुळे आर्थिक विकासात भर पडत आहे.

**वटपौर्णिमेचा सण साजरा करण्याचे प्रमाण व पद्धती :**

१०० नमुन्यांच्या आधारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे हे समजून येते की, एकूण पैकी ६६% महिला वटपौर्णिमा सण साजरा करतात. ३४% महिला हा सण साजरा करत नाहीत. यामध्ये ८३.३% महिला ह्या वटपौर्णिमेची पूजा प्रत्यक्षात वडाच्या झाडापाशी जाऊन करतात, तर १६.६७% महिला ह्या वटपौर्णिमा ही घरीच झाडाची फांदी आणून करतात.

यावरून आपल्याला दिसून येते की, जरी महिलांचे घरीच झाडाची फांदी आणून सण साजरा करण्याचे प्रमाण कमी असले, तरी ते पर्यावरणाच्या दृष्टीने घातक आहे.

*** फटाके वापरण्याचे प्रमाण व त्यावर होणारा अंदाजे खर्च :**


भारतामध्ये दिवाळी हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्यामध्ये फटाके उडवणे यात एक प्रकारचा आनंद मानला जातो. यामध्ये सर्व प्रकारच्या फटाक्यांमुळे वेगवेगळ्या प्रकारचे प्रदूषण होते.

या सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट होते की, यावर्षी फटाके आणणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण हे ३४% होते. यामध्ये मागील वर्षासाठी त्यांचा झालेला खर्च अंदाजे ४७,९०० इतका आहे व या वर्षी त्यांचा फटाक्याचा खर्च हा अंदाजे ४३,१५० इतका होता व यातील फरक हा नगण्य आहे. तसेच यावर्षी फटाके न आणणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण हे ६६% इतके आहे; परंतु, काही कुटुंबाचा मागील वर्षीचा फटाक्याचा खर्च हा १८००० इतका आहे.

या तुलनेवरून समजते की, मागील वर्षी फटाके उडवणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण हे जास्त होते व ते या वर्षी कमी झाले आहे. तसेच मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षीचा फटाक्याचा खर्च कमी झाला आहे व यामुळे पर्यावरणाचे संवर्धन केले जात आहे.

**पूजेच्या निर्माल्याची विल्हेवाट :**


या सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट होते की, एकूणपैकी २३% निर्माल्य हे नदीत विसर्जित केले जाते, तर २३% पूजेचे निर्माल्य कचरापेटीत टाकले जाते. तरी सर्वाधिक म्हणजे ३८% पूजेचे निर्माल्य हे घरातील बागेत टाकले जाते.




वरील आलेखावरून असे समजते की सर्वाधिक विसर्जन हे घरातील बागेत होते. ही बाब आहे; परंतु येथे हेदेखील लक्षात घेणे गरजेचे आहे की, नदीत व घरातील बाग या दोन घटकाच्या टक्केवारीतील फरक जास्त नाही. पर्यावरण संवर्धनासाठी नदीतील विसर्जनाचे प्रमाण कमी होणे आवश्यक आहे.

**सणांसाठी पानांची मागणी :**

या सर्वेक्षणाद्वारे दिसून येते की, ८८% लोक हे दसऱ्यामध्ये आपट्यांच्या पानांचा वापर करतात. तरी १२% लोक त्यांचा वापर करत नाहीत.




वरील वापरावरून लक्षात येते की, दसऱ्यामध्ये आपट्यांच्या पानांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.



Scanned with CamScanner

यावरून समजते की, या झाडांच्या पानांची मागणी बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. यामुळे या झाडांची लागवड मोठ्या संख्येने करण्यासाठी दिले जाते व पर्यावरण विकास या दृष्टीने एक पाऊल पुढे पडते.

**निष्कर्ष**

हळूहळू भारताची अर्थव्यवस्था ही विकसित होण्याच्या मार्गावर आहे. तेव्हा देशातील सर्व घटक हे या प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. अशा वेळी आपण पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण पर्यावरण ह्या घटकाचा योग्य उपयोग हा आपल्याला विकासासाठी महत्त्वाचा आहे. म्हणून त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

या सर्वेक्षणातून स्पष्ट केलेल्या बाबींच्या आधारे कोणते घटक पर्यावरणाच्या दृष्टीने अपायकारक आहेत आणि उपायकारक आहेत हा निष्कर्ष काढता येईल. तो खालीलप्रमाणे -

**कारक घटक :**

* ८३.३% महिला वटपौर्णिमेची पूजा ही झाडापाशी जाऊन करतात. त्यामुळे तेवढ्या प्रमाणात झाडाच्या फांद्या तोडल्या जात नाहीत.
* ६६% कुटुंब फटाके आणत नाहीत.
* ६१% पूजेचे निर्माल्य व्यवस्थित विल्हेवाट लावतात.

आपट्याच्या पानांचा वापर हा ८८% होतो. जरी पाने तोडली जात असली, तरी सणामुळे त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असली तरी त्याच्या उत्पादनासाठी त्यांची लागवड करावी लागते.

अशा प्रकारे या बाबी पर्यावरणास पूरक आहेत

**मारक घटक :**

* जरी प्रदूषण व पर्यावरणास अपायकारक ठरणाऱ्या घटकाची टक्केवारी कमी असली तरी त्यांचे प्रमाण आणखी कमी होणे गरजेचे आहे.

कु. शिंदे काजल बालाजी
कु. लाटे ऋतुजा सुदर्शन
टी.वाय.बी.ए. अर्थशास्त्र विभाग
**मार्गदर्शक**
**डॉ. अंजली रामचंद्र कदम**
साहाय्यक प्राध्यापक,
एस. एन. डि. टी. महाविद्यालय, पुणे
aanjalikadam@gmail.com
९४०३१८६४३९





Scanned with CamScanner